म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २०६९

प्रकाशन ६३ वें

# नव-काव्य-समीक्षा

लेखक
स. वा. दीक्षित

REFBK-0007564

५ जून १९५१ : : मूल्य ८ आणे

गेल्या पंधरा वर्षांत

# मनोहर ग्रंथमालेनें

## सादर केलेलीं उज्ज्वल प्रकाशनें

| | |
|---|---|
| फ्रेंच राज्यक्रांति : न. चिं. केळकर | २॥ |
| राका : सौ. संजीवनी मराठे | १॥ |
| प्रतारणा : प्रा. दांडेकर | २ |
| संसार सोपान : गिरिजाबाई केळकर | १॥ |
| वादळी वारे : (तृ. आ.) प्रा. द. के. केळकर | ४ |
| संस्कृतिसंगम : प्रा. केळकर | ६ |
| चंपी आणि मोत्या | १॥ |
| वेद प्रकाश : पाठकशास्त्री | १० |
| जीवनविहार : कालेलकर | २ |
| स्मरणसांखळी : कमलाबाई देशपांडे | ६ |
| रानोमाळ : रा. वि. फडतरे | २॥ |
| साहित्यविहार : प्रा. केळकर | ३ |
| गांवरान गीता : न. चिं. केळकर | २ |
| काव्यालोचन : प्रा. केळकर | ५ |
| हंसरा निर्माल्य : कमलाबाई देशपांडे | २ |
| 'नरसिंह' केळकर : वि. उ. वैद्य | १॥ |
| ज्ञानेश्वरी सर्वस्व : न. चिं. केळकर | ५ |
| ठेंगणें अस्मान : श्रीधर देशपांडे | ४ |
| मानसचित्रें : गंगाधर गाडगीळ | २॥ |
| उपायन : म. म. केळकर | २॥ |

(कव्हर पान ३ पहा.)

६५३९६
१०।३।६९

मनोहर ग्रंथमाला : प्रकाशन ६३ वें

२०६२

# नव-काव्य-समीक्षा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम
अनुक्रम ६५३९६ वि: विवंध
क्रमांक २०६२

लेखक

स. वा. दीक्षित

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०
REFBK-0007564
दा. क्र. ७५६४

५ जून १९५१

मूल्य ८ आणे

# प्रस्तावना

'नवकाव्यसमीक्षा' या लहानशा पुस्तिकेला मोठ्या प्रस्तावनेची जरूरीच नाहीं. कारण त्यांतील आशय त्या पुस्तिकेमध्यें पूर्णतया स्पष्ट होण्यासारखा लिहिला आहे. वेगळी भूमिका लिहिण्याची आवश्यकता उरलेली नाहीं. परंतु एक गोष्ट सांगावयास हवी, ती ही कीं 'नवकाव्यसमीक्षा' ही नवकाव्यावर सुगम चर्चा या दृष्टीनें मी लिहिली आहे. व म्हणून बुद्धया खोल पाण्यांत कांहीं ठिकाणीं मी शिरलोंच नाहीं. आज नवकाव्याविषयींचीं माझीं मतें सुगम भाषेंत स्पष्ट केलीं आहेत. सध्यांचा वादाचा धुरोळा शमल्यानंतर जास्त खोलांत सवडीनुसार जाईनहि. माझे मूलभूत सिद्धान्त मी निष्ठेनें येथेंच मांडले आहेत. संक्षेप केला असेल तर कांहीं आनुषंगिक असुगम तपशिलाचा.

या पुस्तिकेच्या इतक्या सुंदर स्वरूपांतील प्रकाशनाचें श्रेय अकृत्रिम मित्र श्री. मनोहरपंत केळकर यांस आहे. शब्दांनीं यापरतें मला कांहीं लिहितां येत नाही. त्यांचें ऋण शब्दातीत आहे.

ठळकवाडी, बेळगांव }
१-५-१९५१ }

स. वा. दीक्षित

प्र. क्र. ७५६४

# नवकाव्यसमीक्षा

" मनावरचीं जाळीं-जळमटें आणि कोष्टकोळिजनें झाडून टाकणारी, भावनांची संशुद्धि करणारी जीवनांतील दैन्यांची लाचारी वाटूं न देणारी व शल्यें बोथट करणारी, उमेदीचें कारंजें सतत नाचत ठेवणारी, दुरितांचा निरास करून प्रसन्नतेचें चांदणें फुलविणारी आणि 'ढळला रे दिन ढळला' ह्या जाणिवेनेंही तिळमात्र शांति न ढळतां 'कळला मला प्रसंग, आलों, थांबव शिंग' अशा स्वागत-शीलतेनें सामोरे जायला शिकविणारी ती कविता !"

—राजकवि यशवंत : सा. सं. अध्यक्षीय भाषण.

" सारांश संवेदना, विचार किंवा त्यांचा शब्दवृत्तबद्ध आविष्कार इत्यादि मानवी मनाच्या कुठल्याही व्यापारांत खरेंखुरें, निखालस, अंतिम किंवा मूलदृष्ट्या नाविन्य कवीला ओततां येत नाहीं. तो त्याच्या प्रतिभेचा धर्म नव्हे आणि तें तिचें कार्य नव्हे. फक्त नवें विज्ञान म्हणजे जशीं नवीं समीकरणें, त्याचप्रमाणें नवें काव्य म्हणजे नवीन भावनानिष्ठ समतानता.'

—**बा. सी. मर्ढेकर** : सा. सं. काव्यशाखा
अध्यक्षीय भाषण.

## नवकाव्य ही चीज आहे तरी काय ?

नवकाव्य आज सर्वत्र गाजत आहे. साहित्य संमेलनां-पासून चर्चामंडळांपर्यंत, सभागृह नि व्यासपीठापासून तों रस्ते नि आगगाडीच्या डब्यांपर्यंत या विषयीं चर्चेचा अन्

वादाचा धुराळा उडत आहे. तेव्हां नवकाव्य ही चीज आहे तरी काय याचा एक त्रयस्थ वाचक या भूमिकेवरून परामर्श घ्यावा अन् नवकाव्याइतकेंच दुर्बोध' नवकाव्याच्या टीका-शास्त्रज्ञांनीं जें शाब्दिक जडजंबाल निर्माण केलें आहे त्याबाहेर पडून सामान्य रसिकाला पटण्याइतकी सुलभ चर्चा करावी हा माझा या लेखनांतील इरादा आहे. या नवकाव्यचर्चेत मराठी भाषेला जवळजवळ न झेंपण्या-इतकी चित्रविचित्र संस्कृत व आङ्ग्लभाषांची मिश्रविवाहित संतति निर्माण केली जात आहे. नव्या मानसशास्त्राचें नसतें स्तोम माजवून वाचकांचा 'उंट आणि लंबक' करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तरी या गोष्टी शक्य तेवढ्या टाकून माझी भूमिका मला स्पष्ट मांडावयाची आहे.

## थोडीशी काव्यचर्चा

नवकाव्याची तोंडओळख करून घेण्यापूर्वी थोडी काव्य-चर्चा अपरिहार्य आहे. कारण कांहीं मूलसिद्धान्त तपासून घेतल्याशिवाय पुढील चर्चेचा विस्तार सुलभ होणार नाहीं. कारण काव्य म्हणजे काय हें कळलं म्हणजे नवकाव्य म्हणजे काय तें कळणें सोपें होईल. कारण 'नवस्वरूपी काव्य' तें नव-काव्य. 'काव्य' हा आत्मा स्थायी आहे. तो बदलणारा नाहीं. 'नवीनता' ही शाब्दिक अभिव्यक्ति,आणि अर्थाभिव्यक्ति यांमध्येंच येऊं शकेल. नवता ही वस्त्रासारखी आहे. नव-वस्त्रानें जितपत नवयुवति निर्माण होईल, तितकेंच नवीन अभिव्यक्तीनें नवकाव्य निर्माण होईल. नवकाव्य हें प्रथम 'काव्य' असलें पाहिजे, मग तुमची 'नवता' आणा हें नवकवींना आतां खडसावून सांगण्याची वेळ आलेली आहे.

कारण या मूलभूत सिद्धान्तालाच कलाटणी देण्याचा कांहीं नवकवि व त्यांचे समर्थक प्रयत्न करीत आहेत.

'काव्य' म्हणजे काय याचा ऊहापोह करतांना आरंभींच एका विद्वान् टीकाकाराच्या म्हणण्याची आठवण होते. तो म्हणतो : If asked I know not, if not asked I know. त्या द्रष्टयाला जणू काय काव्यचर्चेच्या या भावी-रणधुमाळीचें स्वप्न पडलं होतं. देशोदेशीं युगायुगांत काव्य म्हणजे काय याचा ऊहापोह झाला आहे. त्या वादांत आज शिरण्याची माझी इच्छा नाहीं. स्थूलमानानें 'वाक्यं रसात्मकं काव्यम्' हेंच काव्यलक्षण मानावें लागेल. वाक्य म्हणजे "शब्दांनी व्यक्त केलेला अर्थ." तो जेव्हां 'रसात्मक' असेल तेव्हां तें काव्य होतें. म्हणजे प्रेयसीचा कटाक्ष 'दृश्य काव्य' असला तरी तो शब्दार्थरूप नसल्यामुळें पारंपरिक 'काव्य' शब्दांत येऊं शकत नाहीं.

आतां 'रस' म्हणजे काय? कांहीं टीकाकार आज अगदीं हिरीरीनें म्हणत आहेत कीं 'रस' चर्चा आतां बंद करा. तो सनातनी माल आहे. आमच्या नवमानसशास्त्रांत त्याला आधार नाहीं. तुमचे ते भाव, विभाव, अनुभाव, व्यभिचारी भाव आतां सगळे संस्कृतच्या अलवणांत गुंडाळून ठेवा.

पण या ठिकाणीं एक गोष्ट विषयांतर करूनही स्पष्ट करावीशी वाटते ती ही कीं जरी विज्ञानामध्यें दुसऱ्याच्या दारीं आपणांला जावें लागत असलें तरी ज्ञानाकरितां लाचारी करण्याचें कारण नाहीं. ज्ञान मिळेल तेथून अवश्य घ्यावें; पण साहेब सांगेल तें 'साहेब वाक्य' प्रमाण मान-

ण्याचें अगदीं कारण नाहीं. वेदवाक्याच्या जागीं 'साहेब वाक्य' या विसाव्या शतकांतही पाश्चात्य टीकाशास्त्राचे कांहीं घाऊक कंत्राटदार मानीत आहेत ही अनवश्यक गोष्ट आहे. हा परंपरेचा खोटा अभिमान म्हणून मी सांगत नाहीं तर आमच्या पूर्वजांनीं ज्ञानाच्या विविध अंगांत खरो-खर स्पृहणीय प्रगति केली होती. साहित्यशास्त्रांत केली होती अन् मानसशास्त्रांतही. पण संस्कृत वाङमयाकडे पाठ फिरवून पश्चिमेकडे तोंड करून बसल्यास याचा पत्ता लाग-णार नाहीं. Abnormal Psychology चें त्यांनीं स्तोम माजविलं नाहीं. पण उठल्याबसल्या आमचे विद्वान् जेव्हां आपल्या ज्ञान भांडाराकडे नजर न टाकतां Freud काय म्हणतो, Joad काय म्हणतो हें पहायला धांवतात तेव्हां त्यांच्या या Abnormal व्याधीची कींव येते. त्या महा-भागांना वंदन असो. पण आसुसलेल्या तोंडानें त्यांच्याकडे पहात रहाण्यापेक्षां त्या नवमानसशास्‍ त्राचे प्रयोग येथें आमचे टीकाकार जेव्हां करतील अन् सिद्धान्त बांधतील तो सुदिन.

असो. एवंच काय, रस म्हणजे काय हा प्रश्न घेतला तरी तेथें वादंग आहेच; पण माझा आज हेतूच सुबोधता असल्या-मुळें रस म्हणजे आस्वाद्यता किंवा आनंददायकता अशी मी व्याख्या करीन. म्हणजे ज्या लेखनांत आनंदोत्कटता निर्माण करण्याची शक्ति आहे तें काव्य. कोणी म्हणतील करुणरसानें-हि आनंद होतो का? होतो असा अनुभव आहे. पण तोही प्रश्न वादग्रस्त समजूं. पण रस म्हणजे 'हृदयंगमता' असें सुलभतर प्रमेय ी मांडीन. जें वाङमय वाचतांच हृदयाला

भिडतं, हालवतं, फुलवतं, तें काव्य. हृदय ही चीज नव्या सायकॉलॉजीमुळें जर बदलली असेल, व्यष्टिरूप टाकून समष्टिरूप पावली असेल तर 'त्या' हृदयाला जें हलवील तें काव्य असेंही म्हणण्याची माझी तयारी आहे तेव्हां नवकाव्याच्या माझ्या अभिमानी मित्रांनींही 'हृदयंगमता-युक्त वाङमय' काव्य याला तरी निदान कबुली द्यायला हरकत नाहीं.

ही हृदयंगमता काव्यांत कशी येते ? कवि काय किमया करतो कीं तीमुळें 'सामान्य' गद्य किंवा पद्यमय गद्य यांमध्यें जो रस नसतो तो गद्यकाव्य किंवा पद्यकाव्यामध्यें येतो ? तर कवि हा आपल्या मनांत स्फुरलेलें भावनांचें, अनुभवांचें, विचारांचें, विकारांचें, आशांचें, इच्छांचें, स्वप्नांचें उदात्तीकरण करून जेव्हां सुंदर शब्द, प्रतीकें, उपमारूपकें यांनीं रंगवून तीं लोकांपुढें मांडतो तेव्हां तीं वाचून मनाला आनंद होतो. आपणाला जणूं काय जी गोष्ट मनांत वाटत होती पण शब्दांत सांगतां येत नव्हती ती ही अशी जाणीव होऊन मन पुलकित होतें. व्यवहाराचें वास्तववादी, आदर्शवादी वा स्वप्नवादी वर्णन त्या त्या कालानुसार प्रतिभेच्या लयानुसार करून एका नवप्रत्ययाचा प्रत्यय कवि घडवून आणतो. तेव्हां 'जीवनांतून जीवनाकडे' हा काव्यहेतु साकार होतो. मातृवियोगानें दग्ध झालेल्या गद्यस्वभावी हृदयांत जें पेटतं पण प्रज्वलित होत नाहीं तें 'आई म्हणोनि कोणी आईस हांक मारी' या काव्यपङक्ति वाचल्यावर उफाळून येतं ही कवीची किमया !

या कवि–प्रपंचामागें कांहीं हेतू असतो असें मानतां

येणार नाहीं. काव्य हें उत्स्फूर्त असतं. तें स्वतांतून उगम पावतें; काव्य लिहितां येत नाहीं, लिहिलं जातं; हीं गृहीत कृत्यें धरल्यावर तर काव्य हें हेतूस्तव लिहिलें जातें हें म्हणणें चुकीचें ठरेल. काव्यामध्यें 'आत्माविष्कार' या शिवाय दुसरें ध्येय नसतें. कवीला लिहावेंसें वाटतें म्हणून तो लिहितो.

आणि म्हणूनच काव्य हें कवीच्या **व्यक्तित्वाचा** आविष्कार असतं. काव्य समष्टीशीं एकनिष्ठ होऊन लिहावं हें कांहीं पंडित आग्रहानें प्रतिपादतात. त्यांची कींव करावीशी वाटते. कविहृदयाशीं फारकत केल्यास काव्य उरणार नाहीं. काव्य हें कविहृदयव्यक्तीशीं शंभर टक्के निगडीत आहे हें त्रैकालिक सत्य आहे. कविमति साहजिकच अति तरल व संवेदनक्षम असल्यामुळें समष्टिचे आघात-प्रत्याघात त्या मनावर साहजिकच होतात. पण कवि आपलें काव्य साकार करतो तें त्याच्या हृदयाच्या मुशींतून. समष्टीच्या प्रकाशझोतानें कविहृदयाच्या स्फटिकांतून परावर्तन होऊन दिसणारें जें इंद्रधनु तें काव्य होय. तेव्हां कवींनीं आज अमुक केलं पाहिजे तमुक केलं पाहिजे, समाजोन्मुख झालं पाहिजे, समाजाकरितां लिहिलं पाहिजे, नवं मानसशास्त्र पचविलं पाहिजे व तदनुसार लिहिलं पाहिजे इत्यादि 'पाहिजे' पुराण हेत्वाभासात्मक होय. कवीनें असं लिहिलं पाहिजे, अमुक लिहिलें पाहिजे इत्यादि कल्पनाच वदतो व्याघातासारख्या आहेत, यांत्रिक आहेत. याच दृष्टीनें कवि निरंकुश मानले गेले आहेत. कारण खऱ्या कवींना अंकुश लागत नाहीं, ते या पलीकडचे असतात. (आणि कांहीं कवींना अंकुशाची खातर नसते म्हणून तेही त्यापलीकडचे असतात!)

काव्यांत बोध येईलच असें नाहीं हें वरील विवरणावरून स्पष्ट होईलच. पण तो येणार नाहींच असेंही नाहीं. फक्त आवश्यक असें अंग म्हणून येणार नाहीं. कविमनाला जर त्या उपदेशाचीच उत्कट तळमळ लागली असेल तर तोही काव्यांत व्यक्त होईल, अन् तो 'जुनें जाउंद्या मरणालागुन' असें म्हणत उठेल.

**रससंख्या :** काव्यांत रस किती असावे हा प्रश्न एक उपप्रश्न म्हणून पुढें येतो. याविषयीं आत्यंतिक मत मांडणं कठीण आहे. मर्ढेकरही या ठिकाणीं पारंपरिक होतात. त्यांनींच म्हटलं आहे, "प्रेम, द्वेष, दया इत्यादि विवक्षित भावनांत एखाद्या नव्या तत्सदृश भावनांची भर आजपर्यंत कुठल्याही कवीला घालतां आलेली नाहीं इतकेंच नव्हे तर भावनेचें स्वरूपच असें आहे कीं विवक्षित भावनांत अशी भर घालणंही वस्तुतःच अशक्य गोष्ट आहे." मी एवढेंच म्हणेन कीं भरतानें आठ रस मानले; नंतर नववा शांत-रस आला; भक्तिरस आला, वत्सलरस आला, प्रेयान् आला, नवकवींचा 'उद्वेग' रस येऊं घातला आहे; हरकत नाहीं. काव्य 'नवरसरुचिर' असावें. 'नव' म्हणजे 'नवीन' 'नऊ'च नव्हे; पण रसयुक्त असावें हाच आग्रह. प्रा. ना. सी. फडक्यांच्या शब्दांत सांगायचं तर "रसाची कसोटी हातची घालवू नका."

## नवकाव्याची तोंडओळख

इतकी प्राथमिक चर्चा केल्यानंतर विषयाला हात घालणं बरं. गेल्या कांहीं वर्षांत मराठी काव्यांत एक नव्या प्रकारचं काव्य अस्तित्वांत येऊं लागलें. अनिल व बा. सी. मर्ढेकर यांना या नवतेचे अध्वर्यु मानलें जात आहे. या दोघांच्या

कवित्वशक्तीविषयीं वाद नाहीं हें अगदीं आरंभींच मी स्पष्ट उल्लेखितों. इतकेंच नव्हे तर एक नवें युग त्यांनीं कांहीं प्रमाणांत निर्माण केलं आहे ही कबुली मी आनंदानें आरंभींच देतों. म्हणजे माझ्या तथाकथिक ' नवकाव्या ' वरचा रोष पूर्वग्रहमूलक नाहीं, ही गोष्ट मला निष्ठेनें सांगतां येईल.

या कवींनीं काव्याची शाब्द अभिव्यक्ति आणि आर्थ अभिव्यक्ति यांमध्यें एकदम बरेचसे फरक घडवले अन् कांहीं बरेच मूलग्राही वाटूं लागले. शाब्दिक अभिव्यक्तीचें मुख्य अंग म्हणजे मुक्तछंदाला काव्याचें ' वाहन ' त्यांनीं हिरीरीनें करावयाचें ठरविलें. अगदीं मुक्तछंद किंवा मुक्त-कल्प साधे छंद यांमध्यें कवित्वाचा त्यांनीं आविष्कार केला व रविकिरणमंडळानें जें पारंपरिक अक्षर व मात्रा वृत्तांना एक नवें गेय स्वरूप, ताल व लयबद्ध स्वरूप दिलें व नवी छंदोरचना केली ती कला नि कुसर टाकून त्या-ऐवजीं ओबडधोबड मुक्तछंदाचा मार्ग स्वीकारला. त्या मुक्तछंदांतहि आवर्त असतात असें दिसून येतांच त्याही पलीकडे जाण्याची नवकाव्याची वृत्ति दिसूं लागली. पण या अभिव्यक्तीविषयीं एवढें वादंग माजण्याचें कारण नाहीं वा नवल मानण्याचें कारण नाहीं. संस्कृत वाङ्मयामध्यें हजारों वर्षांपूर्वीपासून गद्यपद्यमिश्र अशा सर्व रसात्मक रचनेला ' काव्य ' संज्ञा दिली आहे. तेव्हां ही अभिव्यक्ति नवी नव्हे. नवेपणा असेल तर तो आणखी जीं कांहीं विचित्र तंत्रें आलीं त्यांत आहे. उदाहरणार्थ,

(१) **बाह्य अभिव्यक्तींत**—(अ) तुटक शब्द (आ) कमी अधिक लांबीच्या ओळी (इ) शब्दांच्या वाक्यांतील

सहजक्रमाची मुद्दाम केलेली निर्बुद्ध वा विचित्र उलटापालट (ई) कांहीं स्वकपोलकल्पित वा दुर्बोध वा अकाल पक्व वा संकरजन्य शब्दांची गल्लत (उ) शिवराळ वा अश्लील शब्द वा उपमालंकार (ऊ) काव्यांत अस्पृश्य शब्द नाहीं या हेतूनें हरएक शब्दाला काव्यांत अट्टाहासानें करविला जाणारा प्रवेश (ऋ) नवीं रूपकें, नव्या उपमा, नवीं प्रतीकें, कीं ज्यांत मिल, इंजिन, बाँब, पिस्टन यंत्रें, धुराडीं, धूर, ऊंस, चोयट्या, लिंगें इत्यादि भानगडी आल्याच पाहिजेत.

(२) **आंतरिक अभिव्यक्तींत**—( अ ) जगाविषयीं तिरस्कार, किळस, चिरड वा क्वचित् कींव (आ) जगाच्या वा मनाच्या नपुंसकतेची जाणीव (इ) बरें वाटतें म्हणून मानव्याचें व आशावादित्वाचें दर्शन (ई) व्यक्तिदर्शन हें पाप समजून समष्टिभावानें लिहून ‘ कवीनां कविः ’ होण्याची प्रवृत्ति (उ) महाकाव्य किंवा महाकाव्याची ऐंट वीत दीड वीत वा इंच दीडइंच काव्यांत कोंबण्याचा हव्यास. थोडक्यांत म्हणजे वाचकांना महाकाव्याचीं इंजेक्शन्स किंवा कॅप्सूलस् देण्याचा प्रयत्न. (ऊ) जगाची धांवपळ व त्यामुळें काव्यांतही झालेली यांत्रिकता, तुटके, चुटके, क्षणिका, कणिका, परमाणुका (प्रा. रेगे यांच्या काव्यांत या परमाणुका मिळतात) यांचा आविष्कार. (ऋ) युगप्रवर्तन व युगांतर यांची कवींना होणारी स्वप्नावस्था ( या शब्दाचा उपयोग नवकवींची क्षमा मागून). ( ॠ ) कवि सामाजिक दुःखांच्या सुइणी झाल्यामुळें स्वतःच्या दुःखांची वीण त्यांना नाहींशी होणें. (लृ) दुर्बोधता हा एक विशेष गुण किंबहुना स्थायीगुण झाला. वाचकांना न कळलें तर त्यांची कींव करण्या-

इतकी धिटाई (ऌ) नव्या मानसशास्त्राचें बाळकडू (ए) शिवराळपणा, गलिच्छपणा, लिंगायतपंथ, गर्भादान, विटाळ! सर्व कांहीं यांत खपतं.

अर्थात् अभिजात नवकाव्यांत या गोष्टी सर्व मोठ्या प्रमाणांत असतात असें नाहीं. पण नवकाव्य या नांवाखालीं जें उमाप पीक हल्लीं पिकत आहे व कांहीं कवि व कांहीं मासिकें अट्टाहासानें पिकवीत आहेत त्याचें स्थूल रूप असें आहे.

या नवकाव्याचे युगप्रवर्तक अनिल व बा. सी. मर्ढेकर हे होत हें पूर्वी उल्लेखिलें आहेच. यांच्या काव्यशक्तीविषयीं वाद नाहीं हेंही उल्लेखिलेंच आहे. या कवींच्या मागून प्रा. रेगे, प्रा. य. द. भावे, शरच्चन्द्र मुक्तिबोध, ना. ग. जोशी, मनमोहन, (कांहीं अंशीं) विंदा. करंदीकर इत्यादि मातबर माणसं नवकाव्य लिहीत आहेत. पण आणखी शेंकडों किरकोळ माणसंही नवकाव्यांत घुसत आहेत. कांहीं मासिकांचे कंपूही तापल्या तव्यावर भाकरी भाजून घेत आहेत आणि तवा तापवूनही ठेवीत आहेत आणि इतकें कांहीं वारेंमाप पीक या नवकाव्याला येत आहे कीं, कित्येक वेळां तुम्हांला कांहीं वाटेल तें चित्रविचित्र शब्दांत लिहून दुर्बोधतेच्या अर्थप्रसूत्वांत गुंडाळून ‘कांहीं’ मासिकांपर्यंत तुमचा वशिला पोंचवून त्यांतून छापून प्रसिद्ध करवलं कीं तें नवकाव्य इतकी व्याख्या करण्याची सकारण वेळ आली आहे. कांहीं मासिकांत प्रसिद्ध होणारें काव्य हें ‘काव्यात्म’ नसून ‘वशिलात्म’ असतें हें उघड असतें व दुर्बोधतेमुळें तें नवकाव्याच्या भट्टयांत काव्यत्वानें खपतें किंवा सिद्धसाधकत्वानं खपविलं जातं! पण आहे हें नवयुग असें आहे.

आणि या नवें युग उभारणारांच्या अतिमान उत्साहामुळें व कंपूबाजीमुळें आज खरें नवकाव्य बदनाम होत आहे इतकेंच नव्हे तर कांहीं सिद्धहस्त नवकवींना या युगवाणीचा साक्षात्कार झाल्यासारखें होऊं लागलें आहे व तेही या छापाचें नवकाव्य फॅशन म्हणून लिहूं लागले आहेत.

## नवकाव्याविषयीं एक परिचर्चा-प्रयत्न

या नवकाव्याविषयीं सोदाहरण चर्चा थोडयाच वेळांत करावयाचीच आहे. पण या विषयींच मी एक वेगळाच मनोरंजक व उद्बोधक यत्न करणार आहें. तो म्हणजे या नवकाव्याविषयींच कांहीं उद्बोधक साक्षी काढणें. मुख्यतः नवकाव्यांच्या समर्थकांच्याच साक्षी मी काढणार आहे. सिद्धान्तपक्षीं फक्त राजकवि यशवंत यांची साक्ष पुरेल. एक प्रकारें नवकाव्याविषयीं अधिकृत रूपाची परिचर्चाच मी वाचकांपुढें मांडणार आहे व मला आवश्यक वाटेल त्या ठिकाणीं माझ्या मतांचें दिग्दर्शन करणार आहें. तें दिग्दर्शन वेगळें दाखविलें जाईल. या परिचर्चेनें आपणांला आज कांहीं ख्यातनाम व अधिकारी व्यक्तींचीं एतद्विषयक मतें कळून विचारमंथनाला मदत होईल. मी या साक्षी-करितां नवकाव्यातर्फे (१) श्री. बा. सी. मर्ढेकर (सा. सं. काव्य शाखाध्यक्षीय भाषण). (२) डॉ. गं. ब. ग्रामोपाध्ये (आर्द्रा : प्रस्तावना). (३) शरच्चंद्र मुक्तिबोध (नवी मळवाट : प्रस्तावना) यांना आवाहन करणार असून सिद्धान्तपक्षी फक्त राजकवि यशवंत (सा. सं. अध्यक्षीय भाषण) यांची साक्ष काढणार आहें.

(१) **बा. सी. मर्ढेकर**–मर्ढेकर यांनीं आपल्या भाषणारंभींच असं म्हटलं आहे कीं 'सगळ्याच आधुनिक काव्याबद्दल असे गैरसमज फारसे प्रचलित आहेत असें म्हणतां येत नाहीं. आधुनिक काव्य आणि नवीन काव्य असा फरक करावा लागेल' असें सांगून पुढें ते म्हणतात : आधुनिकता कालसापेक्ष आहे...तुकारामाच्या काळीं त्याचे अभंग जितके आधुनिक होते तितकेच माधवराव पटवर्धनांच्या कालीं त्यांचे गझल आधुनिक होते. त्या आधुनिकतेचें स्वरूप समकालीन विचारभावनासृष्टीवर तद्वत् प्रचलित भाषा व आविष्कारपद्धति यांवर अवलंबून असतें. मात्र त्यांतून काव्यांतील नवीनतेचें गमक आपल्या हातीं येण्याचा फारसा संभव नाहीं.

पुढें ते म्हणतात कीं, 'तात्विक नाविन्य, नवें ज्ञान कुठल्याही कवीला साधणें अशक्य आहे. मग तो कवी कितीही मोठा असो. त्या त्या काळांतील विचारवंतांनीं प्रसृत केलेलें नवें ज्ञान कवि फक्त आपलेंसें करूं शकतो.. केशवसुतांच्या 'तुतारीचा' सूर आणि समर्थ रामदासांच्या 'वन्हि तो चेतवावारे, चेतवीताचि चेततो' ह्यांतील प्रेरणा कालानुसार आधुनिक वा जुन्या असल्या तरी त्यांतील नाविन्य एकाच रंगाचें.

भाषा, वृत्तें, विचार, विषय यांचें नावीन्यही शेवटीं आधुनिकतेशीं जुळतें दिसतें असें सांगून पुढें ते म्हणतात, "शब्दांचें स्वरूप, त्यांचे ध्वनि आणि भाषेची घडण हीं कालाबरोबर बदलत असतात आणि हा बदल काव्यांत आपोआपच प्रतिबिंबित होत असतो. त्याचप्रमाणें जीवनौघाबरोबर मानवी विचार, हेतू व भावनाविषय हेही

बदलत जातात; आणि हाहि बदल, आपोआपच काव्यांत प्रतिबिंबित होत असतो. काव्यांत प्रतिबिंबित होणारे हे बदल, क्रिया आणि प्रतिक्रिया अशा दोनही पद्धतींनीं आपलें अस्तित्व प्रकट करतात.....ह्या बदलांचें खरें नातें आधुनिकतेशीं जुळतें, काव्यांत अभिप्रेत असलेल्या नाविन्याशीं नाहीं.

काव्यांत नावीन्य कशानें येतें याचें उत्तर त्यांनीं पुढील शब्दांत दिलें आहे व एका नव्या सिद्धान्ताची मांडणी केली आहे. ते म्हणतात, "भावनानिष्ठ समतानता ही जर काव्यात्म अनुभूतीची खूण तर तिच्यांतलें नाविन्य म्हणजेच काव्यांतील नाविन्य हें ओघानेंच आलें."..या साक्षीचा शेवट लेखारंभीं उद्धृत केलेल्या परिच्छेदानें करतां येईल. (अर्थात् भावनानिष्ठ समतानता ही गोष्ट बरीचशी गूढ स्वरूपाची आहे व मूलत: नावीन्य त्यांत तरी आहे किंवा नाहीं ही गोष्ट विवाद्यच आहे.)

मर्ढेकरांनीं 'कांहीं कविता' या आपल्या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेंत लिहिलेला परिच्छेदही महत्त्वाचा आहे. ते म्हणतात : शब्दांवर थोडी हुकमत असली आणि लय तोंडवळणीं पडली म्हणजे कविता लिहिणं फारसं कठीण नसतं. त्यापलीकडे कांहीं पुढील लिखाणांत आहे किंवा नाहीं हें वाचकच ठरविणार. त्यांचं मत अनुकूल पडलं नाहीं तर लेखकानें योग्य तो बोध घ्यावा. पण 'भूमिके'चा टोप चढवून आणि तळटीपांचे पैंजण घालून नकटीला शारदेचें सोंग घ्यायला लावणं हा त्यावर तोडगा खास नाहीं.

**( २ ) डॉ. गं. व. ग्रामोपाध्ये**-- डॉ. ग्रामोपाध्ये यांनीं 'आर्द्रा' या प्रा. भाव्यांच्या काव्यसंग्रहाला लिहिलेल्या

विद्वत्ताप्रचुर प्रस्तावनेंत नवकाव्याच्या पाठराखणीचें काम केलें आहे.

'खरा कवि तोच कीं ज्याच्या काव्यांतून जीवनाच्या अंतिम मूल्यांचा स्पर्श होईल' हा सिद्धान्त त्यांनीं आरंभींच मांडला आहे. [जीवन म्हणजे केवळ एका व्यक्तीचें वा समाजाचें जीवन नव्हे हा धरसोडीचा खुलासाही त्यांनीं केला आहे.] त्यांचा खऱ्या कवीविषयींचा सिद्धान्त तत्त्व-दृष्टया निर्दोष आहे, पण व्यास-वाल्मीकि, कालिदास-भव-भूति वा शेक्स्पिअर-शॉ अशा दर्जाच्या लोकांनाच तो लागू. बाकीच्यांना लागणार नाहीं. पण त्यांना नवकाव्याच्या समर्थनाला तो सिद्धान्त उपयोगी पडला असल्यामुळें तो त्यांनीं मांडलेला दिसतो. नवकवि जीवनाच्या अंतिम मूल्यांसाठींच लिहितात; बाकी किरकोळ लिहीतच नाहींत. ते मानव्याचे घाऊक व्यापारी आहेत, किरकोळ नाहींत. पण सर्वसाधारण नवकवींच्या बाबतींत हा नियम किती जणांना लागेल हें डॉक्टरसाहेबांनींच निःपक्षपातीपणें ठरवावें.

डॉक्टरसाहेबांची पुढें तक्रार आहे कीं केशवसुतांनीं निर्माण केलेलें जें नवकाव्य त्यानें रूढ सांकेतिक कल्पनांचें कवच फोडून खऱ्या काव्याचें दर्शन दिलें; पण त्यांतूनही पुनः परंपरा सुरू झाली. त्या परंपरेंतील पुढील कवींचा प्रयत्न प्रामाणिक असेल, प्रतीतीही खरी असेल, परंतु ही संपूर्ण प्रतीति वाटत नाहीं. यांतही संकेतांचा अभाव आढ-ळतो. अनुभूतीची कक्षाही मर्यादित वाटते.

या मर्यादिततेला फोडून 'नवकाव्य' जन्माला येत आहे असा पुढें आशय व्यक्तवून आजचें युग हें यांत्रिक युग

आहे अन् आजच्या कवितेची संगति व अर्थ त्यांत लागतो असें सांगून त्यांनीं आज काव्याचें पुनरुज्जीवन होत असल्याची ग्वाही दिली आहे.

यापुढें ते म्हणतात कीं, आज नवकवींच्या मनावर सामाजिक परिस्थितीचा परिणाम होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे (पूर्वीं तो होत नव्हता का? ) 'सामाजिक परिस्थिती आणि कविमनाची वैयक्तिक प्रेरणा यांचा हा एक प्रकारचा संघर्ष आहे... भावनात्मकता आणि वैचारिकता यांच्या कांहीं एका रासायनिक प्रक्रियेंतून त्यांची आंतरिक वेदना व्यक्त होत आहे." (हळूहळू डॉक्टरसाहेबांची परिभाषा नवकाव्यवत् होऊं लागली आहे.)

त्यानंतर त्यांनीं एक सिद्धांत मांडला आहे तो अपसिद्धांत आहे असें अत्यंत खेदानें मला म्हणावें लागतें. ते भावे यांच्या प्रतिभेविषयीं म्हणतात कीं, "भावे यांच्या प्रतिभेनें व्यक्ति-जीवनाचें कुंपण ओलांडलें आहे. प्रस्तुत संग्रहांत व्यक्ति जीवनावर आधारलेल्या पांचसहा कविता असल्या तरी इतरांची बैठक सामाजिक आहे." कविमनानें व्यक्ति-जीवनाचें कुंपण ओलांडणें इतकें आवश्यक आहे असें मला वाटत नाहीं. सामाजिक बैठकीवरची कविताच चांगली हा अपसिद्धांत आहे. कवितेला हेतु असावा अशी ही पर्यायानें वकिली होत आहे.

नंतर नवकवितेच्या दुर्बोधतेविषयीं त्यांनीं असें समर्थन केलें आहे : " (नवकवींना) व्यक्त करावयाचा आशय तर इतका 'अमूर्त' कीं तो एकाददुसऱ्या प्रतिमांनीं व्यक्त होणें अशक्य. या सर्व गोष्टींचा परिणाम कांहीं एका प्रतीक-योजनेंत होणें अपरिहार्य आहे (हा कवींचा कम-

कुवतपणा आहे. कवि शब्दसृष्टीचे ईश्वर आहेत ही गोष्ट डॉ. ग्रामोपाध्ये विसरलेले दिसतात इथं ).

पुढें ते लिहितात: "परंतु भावे यांच्या प्रतीकांतून एकच कोणता तरी अर्थ व्यक्त होण्याऐवजीं अनेक अर्थांच्या 'लडी' स्पष्ट होत जातात." (अशा अर्थांच्या लडी स्वाभाविक निर्माण व्हाव्या हीच इच्छा. नाहींतर अशा अर्थांच्या लडी संस्कृत नांवांतून नाहीं का दिसत? शोधणारा (!) असला म्हणजे लडींना काय तोटा? अन् अनर्थालाही! मला एवढेंच नम्रपणें सांगावयाचें आहे कीं डॉक्टरसाहेबांनीं हें लडीप्रकरण म्हणजे 'पिशाच्या' हातीं कोलीत दिलें आहे! आणि आज कित्येक पावशेर नवटाक नवकवि आमच्या काव्यांत अमुक लड्या आहेत अशा आविर्भावांत काव्य लिहीत आहेत!)

अन् पुढें पर्यायानें वाचकांना आगाऊ कोपरखळी देतांना ते म्हणतात: अशा प्रकारची रूपकात्मक आणि बहुअर्थ-प्रसू प्रतीकांची योजना करणाऱ्या कविमनाचें वैदग्ध्यहि तितकेंच असावें लागतें; आणि त्याच्या वाचकांचें मनहि तितक्या पातळीला पोचूं शकणारें पाहिजे." (म्हणजे साधारणतः रसिक वाचकालाही आपलें understanding तपासून घेतलं पाहिजे तर! इतकें गूढ मग वाचकांच्या तोंडावर कवि फेंकतात कां? ते आणि त्यांचे 'जाणते वाचक' यांच्या मध्येंच काव्याचें 'गुफ्तगू' झालेलें बरें; किंवा गद्यपद्यार्थ मंजरी कवितेला जोडून द्यावी. पण याचा समाचार मी जास्त विस्तृतपणें पुढें घेणार आहेच.)

त्यांनाच या गोष्टीची जाणीव होऊन जरा जास्त सौम्य शब्दांत ते हाच मुद्दा असा मांडतात कीं, (नवकविता) सामान्यतः दुर्बोध वाटते. शब्द, अर्थ, संकेत इत्यादींमुळें

कवि आणि वाचक यांच्यांत जो पारंपरिक परिचय असतो तो येथें रहात नाहीं. तो करून घ्यावा लागतो. परंतु एकदां का तो आपुलकीनें करून घेतला कीं, त्यांतली काव्यसृष्टि सुस्पष्ट होत जाते. **नवकविता ही नव असली तरी कविता आहे**. मात्र ग्रहआग्रहांचे, समजगैरसमजांचे, सांकेतिकतेचे आपल्या दृष्टीवर जे पडदे आलेले असतात ते दूर करायला पाहिजेत. आपली दृष्टी आणि कवीची दृष्टी एकमेकांना भिडली पाहिजे. दोन हृदयांत संवाद निर्माण झाला पाहिजे."

अन् शेवटीं नवकवींची वैयक्तिकता ते कबूल करतातच; फक्त धरसोडीनें. ती अशी : " नवकवींची ही वैयक्तिकता म्हणजे स्वतःच्या सुखदुःखाची त्याच त्या अतिपरिचित शब्दांत नि संकेतांत व्यक्त झालेली आळवणी नव्हे. तर ती एक प्रकारची वैचारिक प्रतिक्रिया आहे. ( अन् जुन्या कवींची वैयक्तिकता मात्र स्वयंनिष्ठ; नाहीं का?) अन् शेवटीं नवतेचा इतका उदो उदो केल्यावर ते कबुली देतात कीं : " प्रेम आणि सौंदर्य हे काव्याचे सनातन विषय आहेत. त्यावरचा विश्वास उडणें म्हणजे खुद्द जीवनावरचा आणि अखेरीस काव्यावरचा विश्वास उडण्यासारखें आहे."

या सर्व गोष्टींवरून एकच दिसतें कीं, डॉ. ग्रामोपाध्यांच्या मनामध्यें नवकाव्याविषयीं अद्याप बराच वैचारिक गोंधळ आहे.

## ( ३ ) शरच्चन्द्र मुक्तिबोध

मुक्तिबोध आपल्या 'नवी मळवाट' या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेंत अगदीं आरंभींच म्हणतात : " काव्याची

व्याख्या येथें करावयाची नाहीं. काव्यांत आत्मप्रत्यय हवा. तो नसल्यास त्याला काव्य म्हणतां येणार नाहीं. ही गोष्टहि वारंवार सांगण्याची गरज उरलेली नाहीं" (दुर्दैव हें कीं ही गोष्ट अजून सांगावी लागत आहे.)

त्यानंतर नवकाव्याविषयीं ते पुष्कळ प्रांजलपणें लिहितात कीं—"सर्वसाधारण रसिकांच्या मनांत नवकाव्यासंबंधीं एक प्रकारची प्रतिकूल भावना वसत आहे. नावीन्याच्या नांवावर कांहींतरी तऱ्हेवाईकपणा केला, वाचकांना गोंधळांत पाडील अशी रचना केली कीं झालें नवकाव्य असा बहुतेकांचा समज झालेला आहे. कित्येकदां असा समज खराहि असतो हें कबूल करणें बरें; परंतु नवकाव्यांत दिसून येणारी दुर्बोधता, त्यांतील प्रतिमासृष्टि आणि भावनेचा विशिष्ट गुण या गोष्टी आजच्या सामाजिक परिस्थितीच्या संदर्भानें समजून घेतल्या तर नवकाव्यामागील गंभीर विश्व सहज समजूं शकेल अशी खात्री वाटते."

काव्याच्या नवतेचें पृथःकरण (१) आशयांतील नवता आणि (२) अभिव्यक्तींतील नवता असें करून नवकाव्यांतील दोन मतप्रणालीही त्यांनीं मांडल्या आहेत. त्या म्हणजे (१) समाजवादी तत्वज्ञानावर आधारलेली optimistic अशी एक मतप्रणालि व (२) पृथ्वीची तिरडी बांधूं निघालेली, मानवाचें केंविलवाणें चित्रण करणारी cynical मतप्रणालि.

नवकाव्याच्या स्थायीभावाविषयीं ते लिहितात—"देशांतील विराट विपन्नतेमुळें एक प्रकारची सर्वभक्षी निराशा, विफलता साऱ्या भारतास ग्रासूं पहात आहे."

## ( ४ ) राजकवि यशवंत

राजकवि यशवंतांनीं काव्याविषयीं अत्यंत मौलिक विचार आपल्या साहित्यसंमेलनीय भाषणांत प्रकट केले आहेत. त्यांच्या विचारांची एक मुक्तामालाच देतो :-(१) प्रथम काव्यांतील लोकशाहीची वास्तपुस्त घेऊन त्याविषयीं यथार्थ मर्यादा सांगून त्यांनीं असा स्पष्ट इशारा दिला आहे कीं, कांहीं ग्रामीण किंवा मजूरजीवनांतील शब्द किंवा सजणागीतें वा नाखवागीतें म्हणजे लोककाव्य होणार नाहीं. रंगपटांतील राजाच्या राजेपणाइतकेंच त्यांचें लोक-काव्यत्व होईल.

(२) नवकाव्याविषयीं बोलण्याचा यशवंतांना सर्वतो-मुखीं आग्रह झाला तो जमेस धरून व स्वतः कविश्रेष्ठ व साहित्यसंमेलनाध्यक्ष या पदांचें वैभव जमा धरून त्यांचें मतप्रदर्शनाचें महत्त्व मोजतां येईल. त्यांनीं स्पष्ट सांगितलें कीं, नवकाव्यासंबंधीं वाचकाच्या मनांत कांहीं खटकतें आहे हें स्पष्ट आहे (त्यांना आलेल्या विविध रसिकांच्या अभ्यासकांच्या नवकाव्याविषयीं बोलण्याविषयींच्या विनंत्या-चा स्थूल उल्लेख त्यांनीं केला आहे) पण पुढें ते म्हणतात कीं, "नवकाव्याबद्दल बोलणं जरा अवघड आहे." तें यशवंतांसारख्यांना अवघड कां वाटावें याचा अर्थ सूज्ञांनीच काढावा.

(३) नवकाव्यावर झालेल्या टीकेच्या झोडीची मीमांसा करतांना ते म्हणतात—"नाविन्याचा जव्हां उदय होतो तेव्हां त्याबद्दल बरेच लोक बुचकळ्यांत पडतात, गोंधळून जातात, आणि त्यामुळें त्याचेवर आगहि पाखडतात. हा सनातन अनुभव आहे."

(४) नवकाव्य हें कोणत्या दृष्टीनें नवीन आहे ? असा प्रश्न टाकून ते म्हणतात : ह्या प्रश्नाचें उत्तर विरोधकांच्या दृष्टीनें असें देतां येईल कीं,

(१) तें दुर्बोध आहे.

(२) तें अनिबंध आहे.

(३) जीवनाविषयीं आणि जगाविषयीं विटलेली मनोवृत्ति, कमालीची उबग हा नवकाव्याचा बिशेष म्हणतां येईल.

(४) अमंगळ किंवा शिवराळ शब्दयोजना– चिडलेल्या मनोवृत्तीची निदर्शक.

(५) मानसिक विकृति.

(६) गद्यप्राय प्रवचनात्मकता.

(५) नव-काव्याचा आशय कोणता आहे हें नव-काव्याच्या पुरस्कर्त्यांच्या शब्दांत ते असें सांगतात–" देशांतील विराट विपन्नतेमुळें एकप्रकारची सर्वभक्षी निराशा, विफलता साऱ्या भारतास ग्रासूं पहात आहे; आणि मराठी नवकाव्य मध्यमवर्गीयच लिहीत आहेत. उदात्त ध्येयांचा चुराडा, जीवनांतील उणीवा, स्वप्नभंग ह्या गोष्टी कवीस जाणवूं लागल्या आहेत. बाह्य सामाजिक जीवनांतील अराजक, विसंगति, विद्रूपता, मानवी मूल्यांची हत्या, एका विराट यंत्रव्यवस्थेंत उपकरणमात्र झालेला मानव, ह्या खऱ्या सामाजिक वास्तवाचा कविमनाशीं संघर्ष होऊन जे आर्त स्वर निघत आहेत तेंच हें नव-काव्य."

(६) या नवकाव्यांतील समाजवादपुरस्कारावर आधारलेली एक आशावादी विचारप्रणालि व बहुसंख्य नवकाव्यांत 'पृथ्वीची तिरडी जळो देवा भली ' अशी

सं. का. ... खंड ...

पराकोटीची विटलेली निराशावृत्ति दिसते आणि मज्जांचा गुंता झालेला दिसतो असा त्यांनीं अभिप्राय दिला आहे.

(७) पुढें ते म्हणतात, " नवकवींच्या ह्या जाणीवांचा विफलतेचा, विकलतेचा, उध्वस्ततेचा साकल्यानें विचार केला कीं, ह्या कवींना जगांत कुठेंच चारुता दिसत नसावी असें वाटतें. सगळीकडे प्रेतें नि हाडकें, हाडकें चघळणारीं किंवा केंकाटणारीं कुत्रीं, कवटचा नि करवंटचा, कुजकीं नि सडकीं माणसें असेंच सारें जग ह्यांच्याभोंवतीं असावें ?... **व्यक्तिजीवनाशीं प्रामाणिक राहणें हाहि कवीचा धर्म असून त्या जीवनाचा विचार केल्यास ह्या कवींना जीवनांतील सौंदर्य, कोमलता. शुचिता हीं दिसायला नकोत का ?**

(८) पुढें ते म्हणतात : " आज सार्वत्रिक समाज-जीवनाला अवकळा आली आहे आणि तीमुळें मन व्यग्र व्हावें हें रास्तच आहे आणि ह्या परिस्थितीवर तोडगा आहे तो केवळ समाजवादी तत्वज्ञानाचा आहे असेंहि ह्यांना वाटतें. तें प्रतिपादणें त्यांचा हक्कच आहे. पण तें प्रति-पादणें एवढेंच काव्य नव्हे, आणि तेवढ्या प्रतिपादनांतच त्यांचें विसर्जन होणें म्हणजे कवितेची गति कुंठित होणें होय, प्रतिभा खुरटणें होय. सद्यः स्थितीवर उतारा अस-लेल्या ह्या राजकीय तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणें म्हणजे एक प्रकारची विशाल प्रासंगिकताच होय. ह्या प्रासंगिक-तेंतून ही कविता जन्म घेत आहे. राजकीय तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करण्याव्यतिरिक्त कवितेला दुसरें कार्य असूं नये असा ह्याच्या अर्थ निघतो."

(९) आणि शेवटीं ते स्पष्ट सांगतात कीं, एकाकीपणांत मनाच्या विशिष्ट तंद्रींत आपोआप मुखीं घोळूं लागणाऱ्या काव्याची शाश्वतता या नवकाव्याला नाहीं. तंत्राची व मंत्राची शाश्वतता, बहिरंगाची, देहाची व आत्म्याची शाश्वतता या नवकाव्याला आहे का, ह्याचा विचार करा. समर्थन करतां येणें, वकिली करतां येणें ह्यांतच विजय नाहीं आणि सामाजिक जाणीवेचा कणा असल्याशिवाय कलाकृति कोलमडून पडेल, ह्यांतहि असत्य नाहीं. पण ह्याच्याहि पलीकडची समाजस्थिति–निरपेक्ष अशी जी मनाची अवस्था, त्या अवस्थेंत मनाला साथ देणारी कविता कोणती ह्याचा शोध करा. त्या शोधांत तुम्हांला खास कळेल कीं, ती ही कविता नव्हे.

(१०) मग ती कविता कशी असेल? याचें उत्तर त्यांनीं लेखारंभीं उद्‌धृत केल्याप्रमाणें दिलें आहे.

यशवंतांच्या या भाषणाचें सूत्रबद्ध असें सार ज्ञानप्रकाशकारांनीं फार सुंदर रीतीनें आपल्या दिनांक १२ मे १९५० च्या अग्रलेखांत काढलें आहे, तें असें : ‘ नवकाव्य कसें दुर्बोध असतें ’ हें त्यांनीं त्यांतील कांहीं शेलकीं उदाहरणें देऊन दाखविलें आहे व “ दुर्बोधता अपरिहार्य आहे असें कवींनीं म्हणणें आणि वाचकांनीं मान्य करणें दोघांनाहि हितावह नाहीं. ” असें स्पष्ट बजावलें आहे. “ कविता वाचकांना समजायला हवी पण ही जबाबदारी मानायलाच कवि तयार नाहींत असें दिसतें. ही वृत्ति असावी याचें आश्चर्य वाटतें. अभिव्यक्तीच्या असमर्थतेमुळें येणाऱ्या दुर्बोधतेकडे क्षमाशील दृष्टीनें तरी पाहतां येईल. पण अर्थ समजला जाईल अशा तऱ्हेनें लिहायला आम्ही बांधलेले नाहीं अशी जी वृत्ति

दिसते ती उद्धटपणाची, रानवटपणाची नव्हे काय ?" असा त्यांनीं जो रोकडा सवाल केला आहे त्याचा नवकाव्यनिर्मिति करणाऱ्या कवींनीं व त्यांच्या चाहत्यांनीं विचार करणें जरूर आहे असें आम्हांस वाटतें. जीवनाविषयीं आणि जगाविषयीं विटलेली मनोवृत्ती हा नवकाव्याचा विशेष म्हणतां येईल. त्याशिवाय नवकाव्यांत चिडलेल्या मनोवृत्तीचा निदर्शक अशी अमंगळ किंवा शिवराळ शब्दयोजना, मानसिक विकृति, गद्यपद्य रचना वगैरे जे दोष दिसून येतात त्यांचाहि यशवंतरावांनीं समाचार घेतला असून " व्यक्तिजीवनाशीं प्रामाणिक राहणें हाहि कवीचा धर्म असून त्या जीवनाचा विचार केल्यास ह्या कवींना जीवनांतील सौंदर्य, कोमलता, शुचिता हीं दिसावयास नकोत का?" असा प्रश्न केला आहे. त्याचप्रमाणें "राजकीय तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करण्याव्यतिरिक्त कवितेंला दुसरें कार्य असूं नये असा नवकाव्याचा अर्थ होतो ही गोष्ट त्यांनीं रसिकांच्या नजरेला आणली आहे. 'चालू समाजस्थितीचें प्रतिबिंब ललित वाङ्मयांत पडावें पण तें प्रतिबिंब नुसत्या ओंगळाचेंच कां असावें ?' हा त्यांचा सवालहि विचार करण्यासारखा आहे यांत शंका नाहीं."

## नवकाव्यांतील शंख, शिंपले आणि मोतीं

आतां नवकाव्यांतील कांहीं उतारे वानगीदाखल देतों. आतापर्यंतच्या चर्चेवर त्यानें उत्तम प्रकाश पडूं शकेल.

"कांहीं कविता" हा मर्ढेकरांचा संग्रह प्रथम हातीं घतला तर आरंभींच ते अत्यंत विनीत वृत्तीनें सांगतांना दिसतात कीं—

माझा अभंग माझी ओवी । नतद्रष्ट गाथागोवी ।
इंजिनावीण गाडी जेंवी । घरंगळे ।।
कुठें ज्ञानेश्वर श्रेष्ठ । कुठें तुकाराम पवित्र ।
कुठें समर्थ धीरोदात्त । संत सर्व ।।
अहो शब्दराज ऐका । लाज सेवकाची राखा ।
नाहींतरी वरती काखा । आहेत ह्या ॥

नवकवींना जगाविषयीं वाटणारा उद्वेग मर्ढेकर असा व्यक्त करितात—

पृथ्वीची तिरडी,
एरव्ही परडी
फुलांनीं भरली,
जळो देवा भली.

किंवा

सत्तेचेंच तूप । सत्तेचीच पोळी ।
मानव्याची होळी । भाजाया ती ॥
देवा, ऐशी भूक । कासया दिलीस
झालों कासावीस । मीही नंगा॥

त्यांच्या उपरोधाची भेदकता खालील उताऱ्यांत दिसेल—

जे न जन्मले वा मेले । त्यांसी म्हणे जो आपुले ।
तोचि मुत्सद्दी जाणावा । देव तेथें ओळखावा ।।
मोलें धाडी जो मराया । नाहीं आंसू आणि माया ।
त्यास नेता बनवावें । आम्हां मेंढरास ठावें ।।
जो जो उठे तो तो नेता । मारी लंब्या चवड्या बाता
परि हुल्लडीचा नियंता । कोणी नाहीं ।।
शब्दशूर वाचीवीर । ऐसे पुढारी थोरथोर ।
जयीं प्रेतांचा बाजार । बोलविला ।।

त्यांचीं आधुनिक रूपकें खालील प्रकारचीं आहेत—

...ठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वीकृत
क्रमांक ४५३६६ दि: १०/०२/
...
२०९२



जाणे शुद्ध शुचिर्भूत । एक प्रायोगिक सत्य ।
जरी त्याचेंच अपत्य । हिरोशिमा ।।
माझ्या अंतरीं अपाय । दाटते काळोखाची वाफ ।
जिथें हांक शिट्टी साफ । किंचाळते ।।

ज्याला मिश्र रूपकें (Mixed Metaphor) असें फॅशनेबल नांव आहे (व ज्यांत वैराग्याच्या विशाल झोळीप्रमाणें कांहींहि खपूं शकतें) अशा चमत्कृति व तज्जन्य थोडीफार दुर्बोधता याचा एक नमुना—

किडलीं काळोखाचीं फळें । रात्रपाळी यंत्रामुळें ।
चाखतां भाव-यकृत पिगळे । विषमज्वरें ।।
रात्र-पापणीचे केस । तेच तारा-रश्मि वेष ।
परि निद्रेचें साहस । करवेना ।

आधुनिक स्वभावोक्तीचें उत्तम उदाहरण म्हणजे—

अहा, कोळसेवाला काळा
नव्या मनूंतील गिरिधर पुतळा ।।
दणकट दंडस्नायू जैसे
लोखंडाचे वळले नाग
कभिन्न काळ्या मांड्या जैशा
पोलादाचा चिरला साग ॥

उदात्ततेची चुणूक अशी उठून दिसते—

पोरसवदा होतीस
काल परवां पावेतों
थांब उद्यांचे माउली
तीर्थ पायांचें घेईतों.

पण मर्ढेकरांना बीभत्सता, अश्लीलता आणि दुर्बोधता या

त्रिदोषाची बाधा कांहीं प्रमाणांत आहे. बीभत्सतेचें उदाहरण म्हणून—

पोटांतील स्निग्धभाव
नैसर्गिक ज्यांत वाव
वितळतील विष्ठेमधि, आपणां समान !'

हें देतां येईल. अश्लीलतेच्या बाबतींत पुढील उदाहरणें पहा–

तुझ्या भुरक्या केसांचें
वळ माझ्या गालांवर
माझ्या ढिल्याशा बोटांचे
तळ तुझ्या स्तनावर

किंवा

पहा विचारुनि त्यांना कसली
मैथुनांत रे असते झिंग
दाखवितील ते भोंक 'रिकामें'
जिथें असावें मांसल लिंग.

खालील पङ्क्तीही कांहीं हृद्य वाटत नाहींत—

—अशीच होती नकटी एक
उलटे केस नि तिरप्या भिवया
मुरकत दावी उरोज उन्नत
ढेपा जैशा तेल्या घरच्या
काय हलाखी स्त्रीत्वाची ही;
माणुसकीचें काय विडंबन
भोगशून्य करि भोग व्यथेचें
लिंग-गंड प्रच्छन्न प्रदर्शन.

दुर्बोधतेविषयीं व इतर दृष्टींनींही "पिपांत मेले ओल्या उंदिर" ही कविता हिडीस वाटते. त्याचप्रमाणें खालील

पङ्क्तींतील अर्थहि 'प्रयत्ने शब्दांचे कण रगडुनी अर्थहि गळे' अशा प्रकारेंच दिसला तर—

पंक्चरली जरि रात्र दिव्यांनीं
तरी पंपतो कुणि काळोख
हंसण्याचें जरि वेड लागलें
भुंकतात तरि अश्रू चोख
फतकन बसली रबरी रात्र
दुजा न टायर त्या अवकाशीं
राठ मनाच्या चाटित बसलीं
पापुद्र्यांच्या कुत्रीं राशी
खांद्यावरती न्यावी रात्र
जमेल ज्याला त्यानें त्यानें
डोळ्यावरती जरा कातडें
ओढावें,—पण हंसतमुखानें
पंक्चरलेल्या रबरी रात्रीं
गुरगुरवावीं रबरी कुत्रीं !!

आतां प्रा. य. द. भावे यांच्या 'आर्द्रा' या काव्य-संग्रहाकडे वळूं.

अगदीं आरंभींच 'विवस्त्र पांचाली' कवितेंतील सूचकतेचा उल्लेख करावासा वाटतो.

भीष्म द्रोण कृप
अर्थाचे दास
विवस्त्र पांचाली
विवस्त्र पांचाली.

थोडक्या शब्दांत पुष्कळ अर्थाचें सुंदर आविष्करण यांत आहे.

"चालली आहे ही आगगाडी", "विवस्त्र पांचाली", "चोयट्या", "वयें वांकला" "आर्द्रा" इत्यादि कविता प्रतीकात्मक कविता आहेत. 'दोन रक्तबिंदू' मधील यादवीचें प्रतीकही अर्थावगाही आहे. 'बांधल्या मुसक्या'-मधील प्रतीकें अतिरिक्त आहेत.

पण दुर्बोधतेची छाया पुष्कळ ठिकाणीं आहे. 'रम्य भाविकाल' या कवितेंतून अज्ञातांतून ज्ञातार्थाची प्रतीति होते असें वाटतें. त्यांतील शेवटल्या ओळी—

फडा काढितात
शेषाच्या ऐटीनें गांडुळें अनंत
डोलत गातात
रम्य भाविकाल !

इथं थोडा अर्थाचा पत्ता लागूं लागतो.

'धुकें घासतें पाठ' ह्या कवितेवर T. S. Elliot यांच्या

"The yellow fog that rubs its back
Upon the window panes."

या काव्यपङ्क्तीची छाया स्पष्ट आहे. बाकी सर्व साधारणतः अर्थाचें धुकें मेंदूच्या तावदानांवर पाठच घासतें. तसेंच "वितळतात बर्फाचे थर" (मनोहर : दिवाळी अंक १९४९) या भाव्यांच्या कवितेचा अर्थ लावतांनाच डोक्यावर बर्फाचे थर जमल्यासारखे वाटूं लागते.

भाव्यांच्या पुढील कवितेला तर गद्यपद्यार्थ मंजरीची आवश्यकता आहे—

एक चित्र
"अनंत शून्याच्या
पोकळी माजीं

तमानें पेटला चंद्रमा दुबळा
तिमिर स्फुलिंगें
सतत वर्षतो
आणि पृथ्वीला
दीन विनवितो
दे दान, दे दान, सुटूं दे गिराण !

वाचक प्रा. भाव्यांना, कवितेचें अर्थदान करून वाचकाच्या बुद्धीचें गिराण सोडविण्याची विनंती करीत आहेत, असा अर्थ कदाचित् यांत दिसतो.

प्रा. पु. शि. रेगे यांचा 'दोला' हा काव्यसंग्रह पाहिल्यास त्यांचें वैशिष्टय चटकन दिसून येतें तें त्यांच्या मिस्किल क्षणिकांविषयीं. खालील नमुने पाहा.—

संकेत—सुमदामहि पूर्वीं जातच नव्हता जेथें
तूं फौंटनपेनहि सहज लपवितां तेथें
संकेत पूर्विचे..तें कलापूर्ण जीवन
काळाचा महिमा जाणवतो आतां पण ।।

डोळे मोडित—डोळे मोडित चालसी
उभा गांव चालविसी
मागें वळून पाहसी
उभा गांव चाळविसी

उजाडलें—उजाडलें मघांशींच
कसें उठवूं ग तुला ?
आताशींच तर कुठें
तुझा डोळा हा लागला

दोनच दिवसांनीं—दोनच दिवसांनीं का अगदीं
काम तसें बुडणार ?

फराळास तरि देइन म्हणतें
उद्यांच तर न्हाणार

पण अतिरिक्त 'परमाणुका' मात्र काव्य कितपत होतील याची शंका वाटते.

तुझे आंसू तुझे आसूं
माझे आंसू
ये ग फसूं
आणि हंसू

कुणी राक्षस—कुणि राक्षस माझ्या मनीं गर्जला
नवीन सत्यें दाविन तुजला
माळा—मी नक्षत्रांच्या माळा केल्या
नररुंडांच्या माळा केल्या.

अधिक उदाहरणें देण्याचा मोह आवरला पाहिजे. नवकाव्याचे बाकीचे गुणावगुण थोडयाफार स्वरूपांत या संग्रहांत आहेतच.

दुसरा एक उल्लेखनीय संग्रह शरच्चन्द्र मुक्तिबोध यांचा "नवी मळवाट". त्यांच्या कवितेंतही संमिश्र रूपकें, नवीं प्रतीकें, दुर्बोधता वगैरे आहेत. पण दुर्बोधता कमी आहे. दोषांपेक्षां गुणच जास्त आहेत. मर्ढेकरांच्या नव्या युगाची प्रामाणिक प्रतीति त्यांच्या बऱ्याच कवितांत दिसते. "वश्या म्हणे"चे वसंत हजरनीस यांचेविषयीं कांहींच लिहिणें या स्थितींत शक्य नाहीं. त्यांना आपली 'भूमिका' निश्चित मिळालेली दिसत नाहीं. काव्यांत आवेश आहे, पण निरर्गलता हा काव्यगुण नाहीं हें त्यांच्या लक्षांत लौकर येईल तेवढें बरें. मनमोहन हे एक प्रभावी कवि आहेत. पण त्यांना कुठच्या युगांत

बसवायचं हा प्रश्न आहे. ते शाहिरी कवि आहेत. रामजोशीपंथी आहेत, रविकिरण मंडळांतही बसूं शकतील, नवकवीही आहेत. त्यांची "पतंग आणि दीपशिखा" ही दुर्बोध कविता अस्सल नवकविता आहे. पण यशवंतांनीं आपल्या भाषणांत तिचा विस्तृत समाचार घेतला असल्यामुळें मला जास्ती कांहींच लिहिण्याचें कारण नाहीं. शिवाय ते 'लोककवि'हि आहेत. तेव्हां त्यांच्याविषयीं लिहावयाचें तर एवढेंच म्हणतां येईल, कीं हा प्रतिभेचा अष्टपैलूपणा व त्यांचे अंगांतील निर्विवाद कवित्व यांचे पैलू योग्य प्रकाशित कसे होतील याचा त्यांनींच विचार करून स्वतःच कवितेला तें वळण दिलें तर माझ्यासारख्या त्यांच्या अज्ञात चाहत्यांना अन् हितचिंतकांना आनंद होईल.

आतां इतर अवशिष्ट कवींचा उल्लेख स्थलाभावीं टाळून (उपेक्षाबुद्धीनें नव्हे) नव्याजुन्या काव्याच्या सीमाप्रांतावर जे दोन कवि आहेत त्यांचा थोडा परामर्श घेऊन समारोपाकडे वळतों. ते म्हणजे विंदा करंदीकर आणि क्रमनिरपेक्ष पण बुद्ध्या शेवटीं ठेवलेले प्रा. वि. म. कुलकर्णी. प्रा. कुलकर्ण्यांचा नंबर किती वरचा आहे हें मी न सांगतांच सर्वांना ज्ञात आहे. पण 'नवकाव्याच्या' दृष्टीनें ते अजून जुन्याकडेच झुकत असल्यामुळें मी त्यांचा उल्लेख मुद्दाम शेवटीं करणार आहे.

विंदा करंदीकर यांची 'स्वेदगंगा' वाचल्यावर त्यांच्यामध्यें नवीनता व परंपरा यांचा सुंदर समन्वय दिसून येतो. पण त्यांच्या कवितेनें हा समन्वय कायम टिकविला पाहिजे; ती निष्ठा, त्यांच्या हल्लींच्या कांहीं चित्रविचित्र कविता पाहिल्यावर, राहणार कीं नाहीं अशी शंका येते. त्यांच्या

"मजूर" कवितेंतील कांहीं ओळी अवश्य उल्लेखनीय आहेत. नवकाव्याचा चांगला नमुना म्हणून त्या मांडतां येतील—

मजुरांच्या हाडांचा येथें जळतो अंगार सदा;
मजुरांच्या घामाच्या वाफेवर फिरती हीं यंत्रें
मजुरांचे पिंजुनिया स्नायू सूत इथें हें निघतें,
मजुरांच्या रक्ताच्या रंगानें तें सुंदर होतें
आणिक त्यांच्या या त्यागास्तव मौलिक
झग झग झग झग झग झग
घरघरणारीं चक्रें म्हणती भीषण मंत्र वधाचे
थरथरते ही भूमी खालीं—पाप तिला हें जाचे—
भों ऽऽऽऽऽ
सात वाजले आणिक गिरणी सुटली;
तुरुंगांतुनीं स्मशानाकडे त्याची स्वारी वळली.
हें आलें त्याचें घर
छे! नच त्याचें! घाणीचें घर
डासांचें घर, प्लेगाचें घर, रोगट जंतूंचे घर!
ना त्याचें घर!!
मृत्यूची ही प्रयोग शाळा भेसुर!

प्रा. वि. म. कुलकर्णी यांचा 'पहांटवारा' हातीं घेतला कीं कांहीं काल तर या नवकाव्याच्या वादाच्या अन् वादंगाच्या जंजाळांतून मुक्त झाल्यासारखें वाटतें. रविकिरणमंडळाच्या परंपरेचें जीवनांतील मांगल्य व श्रेयस्; यांच्या प्रतीतीचें एक सूत्र जीवनांतील सत्य, शिव आणि सुंदर या स्थायीभावावर इतर असत्य, अशिव व असुंदर गोष्टींची

जाणीव असूनही त्यांची असलेली व्यक्तिगत डोळस श्रद्धा हें तिचें दुसरें सूत्र; आणि नवकाव्यांतील खऱ्या नवतेचें-ग्रहण हें तिसरें सूत्र तीनही गुणांचा त्रिवेणीसंगम त्यांच्या काव्यांत आहे. तो असाच रहावा हीच त्यांना प्रेमादराची सूचना आणि विनंति. अर्थाइतकेंच शब्द या दुसऱ्या काव्यांगाला जपणाऱ्या नव्या पिढींतील कवींत तर त्यांना जवळजवळ आज अग्रस्थान द्यावें लागेल. त्यांच्या कवितेंतील 'लमाणांचा तांडा' या सुंदर कवितेंतील सूचकता आतां सर्वांना ज्ञातच आहे. जी गोष्ट सांगायला सामान्य नवकवि जिवाचा अन् शब्दांचा आटापिटा करील ती गोष्ट वि. म. कुलकर्णी किती रसिकपणें सांगतात याची एक वानगी म्हणजे त्यांची कविता—

### रात्रपाळीचा मजूर

दिवस मावळे, थकलीं गात्रें
वाट घराची दिसते डोळां
रात्रपाळिचा जादा पैसा
हवा परंतु मिळवायाला
मनात्तेंच ये घरास जाउन
तिजला भेटुन, त्यांना खेटुन
तेल घालुनी मग यंत्राला
म्हणतो, "दुसरा दिवस लागला !"

### 'हेंचि दान देगा देवा

असो. आतांपर्यंत केलेल्या ऊहापोहावरून नवकाव्याचें स्वरूप आणि स्वभाव याविषयीं अधिकृत अशी कल्पना वाचकांना येऊं शकेल. 'नवकाव्य' चर्चेचा समारोप म्हणून कांहीं विशिष्ट अंगांविषयींचं म्हणणं आतां मांडणं उरलं आहे.

'नवकाव्य' ही सर्वस्वीं टाकाऊ वाङ्मयसरणी नाहीं. तसें म्हणण्याचा माझा हेतू नाहीं. नवकवींनीं शाब्दिक अभि-व्यक्ति वा भावनाभिव्यक्ति यांमध्यें दाखविलेलें नाविन्य कालसापेक्षच आहे. त्यांत कांहीं दृष्टींनीं इष्ट धक्के देणारी नवताही आहे. मात्र हें कांहींतरी अचाट आणि अफाट आपण करीत आहोंत ही कल्पना नवकवींनीं व नवकाव्यटीकाकारांनीं सोडून दिली तर कवि अन् वाचक या दोघांच्याही दृष्टीनें तें चांगलें होईल. अनिष्ट धक्के देण्यासाठीं कांहीं विचित्र, विद्रूप, शिवराळ वा अमंगळ रचना करून गर्भादान, विटाळ वा विष्टा यांत लडबडण्याचें कारण नाहीं. कवीच्या अंगीं कवित्व असेल तर त्यानें कविचेष्टा कराव्या, कपिचेष्टा करण्याचें कारण मग पडणारच नाहीं. माझा मुख्य रोख आहे तो मर्ढेकर, भावे, रेगे, मुक्तिबोध इ. कवींच्या बरोबर शेषांच्या ऐटीनें चालणारी जीं असंख्य गांडुळें निर्माण होऊं घातलीं आहेत आणि ज्यांची लागण जाणत्या माणसांनाही होऊं लागली आहे त्यांवर आहे. ही लागण मर्ढेकरांच्या कवितेच्या पिपांत उंदीर पडले, तेव्हांपासून लागली. ती हल्लीं इतक्या स्वरूपांत फोंफावत आहे कीं संजीवनीबाईंसारख्या सिद्धहस्त व मराठी काव्यवाङ्मयांत आपलें निश्चित स्थान असलेल्या कवयित्री-लाही असं नवकाव्य आपणही लिहावं असं वाटूं लागल्याचें त्यांच्या कांहीं अलीकडच्या कविता भासवितात.

मर्ढेकर हे या युगाचे प्रवर्तक म्हणून यथार्थतेनें संबोधिले जातात. अन् त्यांचे अंगांत 'युग-प्रवर्तनाची' शक्ति आहे. परंतु त्यांनींही 'रेडिओंत अन् राधे-क्रिस्न' असले चमत्कार आणि इतर कांहीं उपरिनिर्दिष्ट काव्यदोष जर प्रयत्नानें

टाळले तर तें काव्याला उपकारक होईल. त्यांच्यासारख्या कविश्रेष्ठाला सांगण्याचा माझा अधिकार नाहीं. परंतु त्यांना ‘यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः’ या वाक्याचें मर्म कांहीं सांगायला नको.

यापुढें नवकाव्याच्या कांहीं विशेषांविषयीं थोडा ऊहापोह करावयाचा आहे. ते विशेष म्हणजे (१) दुर्बोधता (२) नवी अभिव्यक्ति (३) जगाविषयीं नवकवींना वाटणारा उद्वेग, उबग, चिरड अन् किळस (४) गद्यप्राय मुक्तछंदात्मक आविष्कार (५) शिवराळपणा (६) त्रुटितता.

(१) **दुर्बोधता**—या नवकाव्याच्या दोषावर माझा सर्वांत मुख्य कटाक्ष आहे. कारण यामुळें ‘काव्यत्वा’चा नाश होत आहे असें माझें मत आहे. कारण, काव्य ‘**हृदयंगम**’ हवें, हृदयाला पोंचणारें हवें. कोणाच्या हृदयाला ? तुमच्या, आमच्या, सामान्य सहृदय (सामान्यतः सुशिक्षित) रसिकांच्या. अगदीं जानपदांच्या हृदयाला तें पोंचणार नाहीं हें मान्य; पण ज्या पांढरपेशा मध्यमवर्गीतील हे कवि आहेत त्या वर्गातल्या साधारणतः सुशिक्षित इसमाला तरी त्याची तोंडओळख व्हायला नको का ? केवळ कवीच्याच हृदयाला कळणारें काव्य असेल तर हा काव्य-प्रसिद्धीकरणाचा खटाटोप कां ? प्रत्येक वाचकाला कांहीं कवि स्वतः कविता समजावून सांगूं शकत नाहीं. तर मग वाचकालाच ती कळली पाहिजे हें आवश्यक नाहीं का ? अन् तो समजायला जर त्याला कोश वा तज्ञ यांची गरज पदोपदीं लागूं लागली तर काव्यानंदाची काय वाट ?

काव्य हें अगदीं गद्याप्रमाणें सुबोध नसतें वा नसावें हें कबूल. त्यांतील ‘ध्वनि’ कळल्यानंतर होणारा आनंद अन्

गोडी सर्व गोष्टी 'वाच्य' केल्यावर होणार नाहीं हेंही कबूल. पण काव्याचा अर्थ कष्टसाध्य तरी हवा कीं नको? थोडें थांबून तरी धुक्याआडच्या चंद्राप्रमाणें दिसायला हवा कीं नको? नाहीं तर तें काव्य हृदयंगम कसें होणार? का कवितेला गद्यपद्यार्थ मंजरी जोडणार? निदान नवकवि तेवढें तरी करण्याचे उपकार करतील का?

हल्लींच्या कांहीं टीकाकारांनीं त्या गूढतेंत अर्थाच्या लडचा लावण्याचा प्रयत्न केला आहे त्याची कींव येते. अर्थ हा फांदीवर फूल निसर्गतःच उमलावं तसा काव्यांत निसर्गतःच आला पाहिजे. कागदी फुलं झाडाला लावूनही या झाडाचीं फुलं असं कोणी आग्रहानं म्हणूं लागला तर आम्ही त्याला काय म्हणूं? अगदीं तसें या लोकांचं होत आहे. अशा लडीच जर काढावयाच्या तर मनमोहनांच्या नांवानें कां ओरडतां? त्यांच्या 'राधे तुझा सैल अंबाडा' या कवितेंत अशा लडी कां काढूं नयेत कीं राधा म्हणजे 'नवकविता', आणि तिचा अंबाडा म्हणजे 'अर्थ'; तो सैल म्हणजे 'विशद' करणारे आजचें 'नवकाव्य-समर्थक.' बिचाऱ्या मनमोहनांना कल्पनाही नसेल त्यांच्या या कवितेंत अशी एक अर्थाची लडी आहे. राधेच्या अंबाडयांत अशी एक बट आहे!

किंवा खालील नमुनाही अशा जमान्यांत उत्तम काव्य कां होऊं नये?

एक मिशी अन् एक बटा
पुढें खुळखुळा खुळखुळता
बिळीं खुळखुळातो गेला
पूर पृथ्वीला अन् आला. (स्वकृत)

किती अर्थपूर्ण काव्य ! गडकऱ्यांनीं नुसत्या बाळाच्या मृत्यूकरितां एकोणीस कडव्यांचा राजहंस रचला. माझ्या या चार ओळींत बालकाच्या निषेकादि स्मशानान्त क्रिया व पितृतर्पणही आलें !

मी पूर्वींच उघड केलें आहे कीं ‘ ध्वनि ’ काव्याला आवश्यक आहे. उत्तम काव्याला प्राणभूत आहे. पण तो आकाशांतून पडत नाहीं. वाच्यार्थाच्या भक्कम पायावर उभा असतो. अन् तो वाच्यार्थ शब्द व अर्थ यांच्या सहकार्यावर उभा असतो. ‘ काव्यं श्रुतं अर्थो न ज्ञातः ’ अशी नवकाव्याची बैठक ‘ ध्वनि ’ स्वाभाविकपणें निर्माण करूं शकणार नाहीं. तेथें ‘ ध्वनि ’ निर्माण करावा लागेल. आणि प्रत्येक आपल्या सोईनुसार ‘ ध्वनि ’ करूं लागला कीं ‘ शङ्खान् दध्मुः पृथक् पृथक् ’, म्हणजे आली कवितेचा गद्यपद्यार्थबोध काढण्याची वेळ !

काव्य म्हणजे सडक नव्हे, पण पायवाट आहे; वृक्ष तोडून मार्ग काढायला लावणारं आफ्रिकन जंगल नव्हे. माझ्या काव्यांत अमुक अर्थ आहे हें जर कवि प्रतिपादूं लागला तर एकाद्या शिलाखंडाचे पोटीं सहस्र दीप तेवत आहेत या हास्यास्पदतेच्या शंकराचार्यांनीं दिलेल्या दृष्टान्ताशीं त्याचें साम्य जुळेल. काव्यांत अचाट गूढता आली तर वैदिक वाङ्मयांतील किंवा महाभारतांतील कूटश्लोकांसारखें काव्याचें स्वरूप होईल. किंवा ‘ दृष्टीचें जें अग्र तें शून्याचें सार तेथें मधुकर खेळे नित्य ’ यासारखें काव्याचें गौडबंगाल निर्माण होईल. या उदाहरणांचें काव्यत्व कोणीही कबूल करणार नाहीं. नवकाव्याच्या अशा प्रकारच्या ‘ गूढ ’ काव्यालाही काव्यसंज्ञा कदापि लावतां येणार नाहीं.

अशा प्रकारच्या दुर्बोधतेमुळें नवकाव्य हें आपल्या 'काव्य' संज्ञेलाच अपात्र ठरत आहे. दुर्बोधता ही कां आली, कशी आली या लटपटी व्यर्थ आहेत. ती आली हा काव्याला रोग झाला; हा काव्याला अपस्मार झाला आहे याची जाणीव नवकवींना लवकर होईल तेवढी बरी. आपल्या स्वत:करितां काव्य लिहायचं तर खुशाल वाटतें तें लिहा. पण दुसऱ्याला 'हृदयंगम' असें काव्य लिहायचं असेल तर तें लोकांना कळलं पाहिजे. प्रसिद्ध करून लोकांचे पुढें तें अनंत हस्तें देण्यांत येत आहे त्याअर्थीं तें लोकांकरितां म्हणून लिहिलं जात आहे हें समजणें भाग आहे. मग तें समजेल असें लिहा. हल्लींचा समाज, त्याची स्थिति, विराट प्रश्न, यंत्रयुग इत्यादि शब्दजंजालानें काम भागणार नाहीं. जशी कवीच्या मनाची या गोष्टीमुळें घडण बदलली आहे तशी वाचकांच्या मनांतही त्याच प्रकारची प्रक्रिया झालेली आहे. कवीची तरल जाणीव आणि वाचकाची नेणीवपूर्ण जाणीव यांत पूर्वीं एवढाच फरकही आतां आहे. कवीच पुढें गेले आणि वाचक होते तेथें आहेत ही कल्पना वाचकांचा बुद्धचा अपमान करणारी आहे. भाषा जास्त अर्थप्रसू आपोआप होत आहे. अर्थामागून शब्द धांवत आहे. शब्दांचा योजकांना तुडवडा नाहीं. खरे कवि शब्दसृष्टीचे ईश्वर असतात. ते समर्पक अर्थावगाही शब्द निर्माण करूं शकतात. नवी निर्मिती समजण्यासारखी करतां येत नसेल तर या शब्दसृष्टीच्या ईश्वरांनीं स्वत:ला तपासून घ्यावं, वाचकाला नाहीं. आज मराठी वाचकांचा (स्वयंप्रणीत) प्रतिनिधी म्हणून मी कवींना ठाम सांगतों (आणि बहुसंख्य वाचक माझ्याशीं सहमत होतील) कीं मला काव्य समजण्या-

पुरतं ज्ञान आहे, रसिकता आहे. मला कळेल असेंच काव्य लिहा. नाहींतर तुम्ही लिहाल तें 'काव्य' मानायला आम्ही साफ तयार नाहीं. तें काव्य होणार नाहीं. तें हृदयंगम नाहीं. उठल्यासुटल्या कवीनें महाकवीचा आव आणून 'वाचमर्थोऽनुधावति'चा आव आणूं नये. आज मराठी काव्याला रोग जडला आहे तो या महाकवींचा. जो उठतो तो म्हणतो कीं मी शब्द हवे तेवढे विणार. त्याची सोय वाचकांनीं आपल्या संसारांत वाटेल तशी लावून घ्यावी. नवकवींना संततिनियमन करायला भाग पाडूं असं सांगण्याची आज वाचकांवर वेळ आली आहे. उठल्यासुटल्या महाकाव्याच्या वल्गना नकोत; समष्टीचे ढोल नकोत. या गोष्टी जन्माव्या लागतात, जन्मवितां येत नाहींत.

(२) **नवी आभिव्यक्ति**–नव्या युगाचें चित्रण करतांच नवीं प्रतीकें, नवी अभिव्यक्ति येणें अपरिहार्य आहे. पण तीं पटणारीं असावीं. 'पृथ्विच्या अक्षांशि लाली, पृथ्विच्या रेखांशि लाली' हें पटतं, 'मेघकणीस' पटतात पण 'अठरा अमावास्या', 'सत्त्याहत्तर कबुतरें', 'मेणकापडी', 'खडीसाखरी' वगैरे गोष्टी पटत नाहींत.

(३) **जगाविषयीं नवकवींची उबग इ. इ.**–त्याचप्रमाणें जगाविषयीं जी उबग या कवींना आली आहे, ती जर खरोखरच अंतर्यामींची असेल, भाडोत्री नसेल, व कवित्व गांठीं असेल तर ती आपोआप रसवत्ता धारण करील. पण सर्वत्र जगांत जी भयानकताच दिसूं लागली, किळस वाटूं लागली, मंगलतेचा मागमूस उरला नाहींसा झाला, तर मात्र मानसिक विकृति निर्माण झाल्यासारखी होईल. पण माझा आग्रह एवढाच आहे कीं जे कांहीं

तुम्हांला वाटतं, जें कांहीं तुम्हाला सांगायचें आहे तें रसाच्या कसोटीला पोंचवा अन् खुशाल सांगा.

(४) **गद्यप्राय मुक्तछंदात्मक आविष्कार**-त्याचप्रमाणें मुक्तछंदाविषयीं. मुक्तछंद म्हणजे कांहीं नवा शोध नव्हे हें मी पूर्वींच सांगितलें आहे. आतां सांगावयाचं एवढंच कीं कुठें शेक्सपिअरची पल्लेदार ब्लॅन्क व्हर्स, कुठें टागोरांचा मुक्तछंद आणि कुठें हल्लींचा मुक्तछंद; काव्य मुक्तछंदांत येऊं शकतें; पण मुक्तछंदांत जें जें येतें तें सगळें काव्य नव्हे एवढेंच!

(५) **शिवराळपणा** —आतां जरा नाजूक अशी अश्लीलतेची अन् शिवराळपणाची बाब. माझी कदाचित् कोती असेल पण प्रामाणिक समजूत आहे कीं अश्लीलता आणि शिवराळपणा यांच्या कांहीं मर्यादा काव्यानें पाळाव्या, कवींनीं पाळाव्या नि मासिकांनींही पाळाव्या. रस्त्यावर नागवें फिरायची तयारी झाली कीं नागवें लेखन करायला हरकत नाहीं. ती तयारी नसेल तर आडून तुमच्या नंगेपणाचें प्रदर्शन आम्हांला दाखवूं नका. हा आडून मारा तोंपर्यंत पुरे. सनातनी आज जगूं शकणार नाहीं हें उघड आहे. आणि त्याच्या मरणाकरितां कोणी रडणार नाहीं. पण जी काय घाण नवकवींना उपसायची असेल ती चांगल्या रीतीनें उपसा अन् आमच्यापुढें मांडा एवढेंच सांगणें. बीभत्स रस करा अन् खुशाल त्यांत डुबा.

आतां अश्लील काय अन् काय नाहीं हा प्रश्नच आहे. पण स्थूल मानानें चार सभ्य लोकांत (सनातनी नव्हे) जी गोष्ट वाचण्यास, ऐकण्यास, करण्यास वा पहाण्यास घृणा वाटेल तें अश्लील, हा सर्वसाधारण दंडक होय. लैंगिक

क्रिया जर अश्लील नाहीं, तिनीं खुमासदार वर्णनें जर अश्लील नाहींत तर ती क्रिया उघडचावर करण्यास लाज कां वाटावी ? अन् जर कृतीला अश्लीलता-बंधनें आहेत तर मति अन् उक्तीलाही त्याच सदभिरुचीचीं पण कांहीं बंधनें असतात कीं नाहीं, असावींत कीं नाहीं हें उत्तर ज्याचें त्यानें द्यावयाचें आहे.

(६) **त्रुटितता** —त्याचप्रमाणें क्षणिका, कणिका या काव्यप्रकारांनाही कांहीं मर्यादा आहेत. त्रुटिततेलाही मर्यादा आहेत. नाहींतर काव्य म्हणजे रसाळ आम्रफला-सारखें न होतां पेपरमिंटच्या गोळ्यांसारखें होईल, किंवा त्यापेक्षांही पिठीसाखरेच्या कणांसारखें होईल. आणि त्याचें काव्यत्व खाणावळींतील प्रसिद्ध घृतधारेप्रमाणें “घृतस्य धारा पतिता न जाने दिवंगता वाथ भुवंगता वा” अशा स्वरूपाचें होईल; अर्थात् या मर्यादा ज्याच्या त्याला निसर्गतःच कळणार आहेत. त्याला दंडक घालतां येणार नाहीं. दंडक हृदयंगमतेचाच !

अन् या सगळा ऊहापोह कशासाठीं ? तर ‘विवक्षितं हि अनुक्तं अनुतापं जनयति’ या दृष्टीनेंच. नवकाव्यावर शेवटचा निर्णय देण्याची शक्यता यशवंतासारख्या कवि-वर्यांनाही नाहीं अन् माझ्यासारख्या लेखणीच्या हमालालाही नाहीं. कालच शेवटचा निर्णय देईल. अन् तो निर्णयच इतिहासांत मानला जाईल. पण मानवी प्रयत्न हा अशा निर्णयाकडे यथाशक्ति ओढ घेत असतो–तो देण्याचा प्रयत्न करीत असतो, त्यापैकींच हा एक प्रयत्न. लेखांतील अधिक उण्याबद्दल कवींच्या क्षमाशीलतेला आवाहन करणेंच माझ्या हातीं आहे. यांत नवकाव्य, नवकवि वा त्यांचे टीकाकार

यांच्याबद्दल वैयक्तिक आकस, तिळमात्रही नाहीं एवढी प्रामाणिक ग्वाही मी देतों.

शेवटीं एवढंच वाटतं कीं हल्लींच्या 'नवकविते'च्या ऋषींनीं आणि समीक्षकांनीं या कक्षा जर संभाळल्या तर वाचकांवर असें म्हणण्याचा प्रसंग येणार नाहीं कीं—

आलों क्षणींचा विसावा म्हणून
टेकले पाय;
पण तूंच हडकलेंस 'कोण' म्हणून
आणि मनांत शिणलेले हेतू
शेण झाले.

...ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ...
...१०५३९६ दि: १०।४।६१
...२०६२ ... २।३।७३
REFBK-0007564
...संग्रहालय ठाणे ७५९८७

प्रकाशक : मनोहर महादेव केळकर,
१९६।८५ सदाशिव पेठ, पुणें २.
मुद्रक : न. वि. सरदेशपांडे, आदर्श मुद्रणालय, पुणें २.

(कव्हर पान २ वरून)

| | |
|---|---|
| संस्कृत काव्याचे पंचप्राण : डॉ. वाटवे | ६ |
| काव्यविहार : माधवराव पटवर्धन | ४ |
| Location of Lanka : Sardar Kibe | २ |
| तिसऱ्या महायुद्धाच्या छायेंत : य. न. केळकर | ५ |
| हिंदी हीच आमची राष्ट्रभाषा : शं. दा. चितळे | ३ |
| हिंदी क्रिकेट : र. गो. सरदेसाई | ५ |
| स्त्रीगीतें : कमलाबाई देशपांडे | ३ |
| मा थेन थेन : कथा संकलन | ३ |
| रझाकार : द. पां. खांबेटे | २ |
| गोकुळच्या गौळणी : पं. महादेवशास्त्री जोशी | २ |
| पाऊलवाट : श्रीधर देशपांडे | ४ |
| आमच्यापुढील प्रश्न | २॥ |
| कमलाक्षीची कहाणी : चंद्रमा यत्नशील | ·॥· |
| टालडुप्पो वाँगिमाडू ऽऽ : अ. वा. वर्टी | ३ |
| क्रांतिकाल : व. ह. पिटके | ४ |
| एकेकाचा स्वभाव : वा. शि. आपटे | २ |
| नव–काव्य–समीक्षा : स. वा. दीक्षित | ·॥· |
| आंबट–गोड : अच्युत बर्वे | २ |

(एकूण ६४ प्रकाशनांपैकीं वरील पुस्तकेंच फक्त शिल्लक आहेत.)

★

मनोहर ग्रंथमाला : टिळक रोड, पुणें २.

# वाङ्मय-शोभा

## सुंदर, स्वल्पमोली, सर्वोत्कृष्ट मासिक

* घरांतील मौल्यवान् सामानामुळें तुमच्या संपन्नतेचें प्रदर्शन होईल आणि मेजावरील नियतकालिकांमुळें तुमच्या सुजाणपणाचा आणि अभिरुचीचा प्रत्यय येईल.

* अभिमानास्पद अशा नियतकालिकांत 'वाङमय-शोभे'ची गणना सुविद्य आणि रसिक मराठी वाचक करतात.

* हें मासिक ललित वाङमयाची आवड पुरी करतांना प्रगमनशीलता दृष्टीआड करीत नाहीं, आणि बौद्धिक भूक भागवितांना बौद्धिक गुलामगिरी लादीत नाहीं.

* मोहक मुखपृष्ठ, चमकदार कथाचित्रें, कल्पनापूर्ण हास्यचित्रें, व्यंगचित्रें आणि सुंदर छायाचित्रें—थोडक्यांत सांगावयाचें तर भरपूर वाचनीय मजकूर आणि सुंदर सजावट हीं 'वाङमय-शोभे'चीं खास वैशिष्ट्यें आहेत.

* 'वाङमय-शोभा' वार्षिक वर्गणी ६ रु.; आजीव सभासद वर्गणी ६० रुपये.

* सवलत-योजनेप्रमाणें २१ रु. चीं पुस्तकें घेणारांस 'वाङमयशोभा' एक वर्ष विनामूल्य मिळतें. माहितीपत्र मागवा.

★

'वाङ्मय-शोभा' कार्यालय,

टिळक रोड, पुणें २.